दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
मुख्य संपादक : सुनिल पोतदार
• वर्ष १५ वे • अंक १६८ • MAHMAR/2006/17212 • रायगड • शनिवार दि.१२ सप्टेंबर २०२० • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

मराठा समाजाच्या न्याय हक्कासाठी सरकार तसूभरही मागे हटणार नाही : मुख्यमंत्री

दै.रायगड नगरी । मुंबई

मराठा समाजाच्या न्याय हक्काच्या मागणीसाठी सरकार तसूभरही मागे हटणार नाही. हा लढा आपल्या सर्वांचा आहे. समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी जे जे काही करता येईल ते सर्व करू. यासंदर्भात आम्ही सर्व संबंधितांनाही विश्वासात घेऊन , त्यांच्या सूचनांचा विचार करणार आहोत. विरोधी पक्ष नेत्यांशी देखील या विषयावर सविस्तर बोलण्यात येईल. सरकार या प्रश्नी सुरुवातीपासून प्रामाणिक आहे आणि तळमळीने हा प्रश्न सोडवू इच्छिते पण राजकारणासाठी मराठा समाजाला भडकविण्याचे आणि आगी लावण्याचे काम कुणी करू नये असे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी स्पष्ट केले. आज वर्षा निवासस्थानी मुख्यमंत्र्यांनी मराठा समाजाच्या विविध संघटनांचे प्रतिनिधी, समाजाची बाजू मांडणारे वकील, अभ्यासक यांच्यासमवेत व्हिडीओ कॉन्फरन्सींगद्वारे संवाद साधला.

हॉटेल, रिसॉर्टस् पूर्ण क्षमतेने सुरु करण्यास राज्य सरकारची परवानगी

कोरोनाचा प्रदुर्भाव रोखण्यासाठी विविध उपाययोजनांची काटेकोर अंमलबजावणी करण्याच्या सूचना

दै.रायगड नगरी । मुंबई

राज्यातील कंटेन्मेंट झोन वगळता इतर भागातील निवास व्यवस्था असलेली हॉटेल्स आणि रीसॉर्टस्, होम-स्टे, बी अँड बी (बेड अँड ब्रेकफास्ट), फार्म स्टे सुरू करण्याबाबत पर्यटन संचालनालयामार्फत नियमावली जाहीर करण्यात आली आहे. मिशन बिगीन अगेन च्या अंतर्गत हा निर्णय सरकारने घेतला आहे.

मिशन बिगीन अगेनअंतर्गत शासनाने निवासी सुविधांना (हॉटेल, लॉज, रिसॉर्टस् इत्यादी) शंभर टक्के क्षमतेने सुरु करण्यास संमती दिली आहे. पण हे करताना कोरोनाचा प्रदुर्भाव रोखण्यासाठी विविध उपाययोजनांची काटेकोर अंमलबजावणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. या सूचनांचा अंतर्भाव पर्यटन संचालनालयाने जाहीर केलेल्या एसओपीमध्ये करण्यात आला आहे. केंद्रीय आरोग्य मंत्रालय, केंद्रीय पर्यटन मंत्रालय, डब्ल्युएचओ, यूएनडब्ल्युटीओ यांच्याकडून जारी करण्यात आलेल्या मार्गदर्शिकेनुसार ही एसओपी तयार करण्यात आली आहे.

एसओपीमध्येहॉटेल्स आणि रिसॉर्टस् यांनी सर्व प्रवाशांची आगमनस्थळी थर्मल गन आदींसारख्या साहित्यामार्फत तपासणी करावी. फक्त लक्षणे नसलेल्या पर्यटक तथा प्रवाशांनाच प्रवेश देण्यात यावा. सेवा देताना तसेच वेटींग रुम आदी सर्व ठिकाणी सोशल डिस्टन्सिंगचे पालन

करण्यात यावे. कॉन्टॅक्ट ट्रेसिंगसारख्या बाबीसाठी संबंधीत प्रवाशाची माहिती प्रशासन किंवा आरोग्य यंत्रणेला देण्याबाबत संबंधीत प्रवाशाची नाहरकत घेण्यात यावी. प्रवाशांनी मास्कचा वापर करणे अनिवार्य आहे. सर्व आवश्यक ठिकाणी हॅन्ड सॅनिटायजर ठेवण्यात यावा. पैशांची हाताळणी करताना योग्य ती काळजी घेण्यात यावी आणि डिजीटल माध्यमातून चलनाची देवाण-घेवाण करण्यास प्रोत्साहन द्यावे. हॉटेल आणि रिसॉर्टमध्ये राहणाऱ्या पर्यटकांची ने-आण करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या वाहनांची प्रत्येक वेळी स्वच्छता करण्यात यावी. पर्यटकांची ट्रॅव्हल हिस्ट्री, हेल्थ हिस्ट्री आदीबाबतची माहिती असणारा आरोग्यविषयक अर्ज चेक-इन करण्यापूर्वी शक्यतो ऑनलाईन भरुन घेण्यात यावा. शक्य असल्यास क्यू आर कोडसारख्या प्रणालीतून स्वयं चेक-इनसारख्या बाबी सुरु कराव्यात. काय करावे आणि काय करु नये (डूज आणि डोन्टस्) संदर्भातील माहिती पर्यटकांना बूकलेट किंवा व्हीडीओच्या स्वरुपात देण्यात यावी. पर्यटकांनी त्यांच्या सामानाची स्वत: ने-आण करावी.

एकापेक्षा जास्त लिफ्ट असल्यास समोरासमोर संपर्क टाळण्याच्या दृष्टीने वर जाणे आणि् खाली येण्यासाठी वेगवेगळ्या लिफ्टचा वापर करण्यात यावा. रुम सर्व्हीस संपर्करहीत असावी. मागवलेली ऑर्डर रुमच्या बाहेर ठेवण्यात यावी. लहान मुलांसाठीचे प्ले एरिया बंद राहतील या मार्गदर्शक बाबींचा समावेश करण्यात आला आहे.

स्थानिकांना नोकरीमध्ये ८० टक्के प्राधान्य केवळ कागदावरच ; प्रत्यक्ष अंमलबजावणी मात्र शून्य

स्थानिकांना नोकरीत ८० टक्के प्राधान्यच्या परिपत्रकाचे कायद्यात रूपांतर करण्याची मनसेची मागणी

दै.रायगड नगरी । विठ्ठल ममताबादे

उरण : स्थानिकांना नोकरीमध्ये ८० टक्के प्राधान्य देण्यात यावे या राज्य सरकारच्या परिपत्रकाचे कायद्यात रूपांतर करण्यासाठी मनसेने आक्रमक भूमिका घेतली असून स्थानिकांना नोकरीत ८० टक्के प्राधान्यच्या परिपत्रकाचे त्वरित कायद्यात रूपांतर करावे अशी मागणी महाराष्ट्रातील मराठी माणसाच्या न्याय हक्कासाठी लढणाऱ्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने कामगार उपायुक्त रायगड प्रदिप पवार यांच्याकडे प्रत्यक्ष भेटून निवेदनाद्वारे केली आहे.

महाराष्ट्र नवनिर्माण सेने अंतर्गत मोडणाऱ्या रोजगार व स्वयंरोजगार विभागाचे अध्यक्ष महेंद्र बैसाणे यांच्या मार्गदर्शनाखाली रायगड जिल्हा संघटक रामदास पाटील, जिल्हा संघटक अभिजित घरत, उपजिल्हा संघटक रितेश पाटील, प्रतीक वैद्य, संजय मिरकुटे, प्रकाश लाड आदी पदाधिकारी कार्यकर्त्यांनी प्रदिप पवार-कामगार उपायुक्त पनवेल कार्यालय यांची भेट घेतली. नोकरीच्या ८० टक्के परिपत्रकाचे कायद्यात रूपांतर करावे अशी मागणी करून तसे निवेदन मनसेतर्फे कामगार उपायुक्त यांना देण्यात आले.

स्थानिक भूमिपुत्रांना नोकरीसाठी विविध राज्याचे आरक्षण धोरण जाहीर होऊन त्याचे काहींनी कायद्यात रूपांतर केले. आंध्रप्रदेश त्यानंतर मध्यप्रदेश गोवा हे राज्य त्यांच्या राज्यातील स्थानिक भूमीपुत्र असलेल्या बेरोजगारांसाठी, त्यांच्या न्यायहक्कासाठी नेहमी आग्रही व कडवट असते मात्र महाराष्ट्र शासनातर्फे स्थानिकांना नोकरीमध्ये ८० टक्के आरक्षणाचा परिपत्रक काढण्यात आला. मात्र हे परिपत्रक कागदावरच आहे. त्याची योग्य अमलबजावणी होत नाही.त्यामुळे महाराष्ट्रातील बेरोजगारांवर बेकारीची कुऱ्हाड कोसळली आहे. परिपत्रकाची योग्य अमलबजावणी होत नसल्याने स्थानिक बेरोजगारांवर खूप मोठा अन्याय होत आहे. महाराष्ट्रात विविध कंपन्या, प्रकल्प, आस्थापनांमध्ये स्थानिकांना प्राधान्य देण्याऐवजी परप्रांतीयांना प्राधान्य दिले जात आहे.शासनाच्या स्थानिकांना प्राधान्य देण्याच्या परिपत्रकाला अनेक ....//२

प्रभाग १९ मधील विकासकामासंदर्भात आढावा बैठक

दै.रायगड नगरी । पनवेल

कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रयत्नातून विधानसभा क्षेत्रात मोठ्या प्रमाणात विविध विकासकामे झाली आहेत. त्याच अनुषंगाने सभागृहनेते परेश ठाकूर यांच्या माध्यमातून प्रभाग १९ मध्ये विकासकामे झाली असून या प्रभागातील आणखी विकासकामासंदर्भात बुधवारी ऑनलाईन आढावा बैठक झाली.

या बैठकीला महापालिकेचे सभागृहनेते परेश ठाकूर, स्थायी समिती सभापती प्रवीण पाटील, ज्येष्ठ नगरसेवक अनिल भगत, नितीन पाटील, राजू सोनी, नगरसेविका दर्शना भोईर, रुचिता लोंढे, शहर अभियंता संजय काटेकर आदी उपस्थित होते.

यावेळी झालेल्या चर्चेनुसार लवकरात लवकर विकासकामे करण्याच्या दृष्टिकोनातून पाहणी करून कामे मार्गी लावण्याचे आश्वासन शहर अभियंता संजय कटेकर यांनी दिले. त्यामध्ये प्रामुख्याने कोळीवाडा मिरची गल्ली येथील सर्व गटारांची कामे, स्वस्तिक प्लायवुड जवळील नाला बंदिस्त करणे, कर्नाळा सर्कल ते झवेरी बाजार ते कर्मवीर भाऊराव पाटील पुतळा पर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे, कोळीवाडा येथे बांधण्यात येणाऱ्या समाजमंदिराच्या कामासंदर्भात संकल्पचित्र सादर करून भव्य समाजमंदिर उभारणे, तसेच कोळीवाडा मच्छी मार्केट येथे कोल्ड स्टोरेज बनविणे या पाच कामांना प्रामुख्याने लवकरात लवकर करण्याचे या बैठकीत कटेकर यांनी आश्वासित केले.

त्याचबरोबर या प्रभागातील अन्य विकासकामासंदर्भातही चर्चा झाली. त्यामध्ये कोळीवाडा रस्ता पुर्न:पुष्टीकरण करणे, सरस्वती हायस्कुल जीर्ण इमारत जमीनदोस्त करणे, महापालिका कार्यालय, नाट्यगृह व इतर येथील काच सफाई करणे, कोळीवाड्यातील सर्व गल्ल्यांमध्ये नवीन पेव्हर ब्लॉक बसविणे, कल्पतरू ते भारत गॅस नालेकाम करणे, वैश्य समाज हॉल समोरील रस्ता पुर्न:पुष्टीकरण करणे, घोडके हॉस्पिटल ते म्हात्रे हॉस्पिटल रस्त्याचे पुर्न:पुष्टीकरण करणे, मिरची गल्ली रस्ता पुर्न:पुष्टीकरण करणे, ...//२

कोरोना प्रादुर्भाव रोखण्यासाठी व्यापारी असोसिएशने तीन दिवस तळा बाजारपेठ बंद

दै.रायगड नगरी । किशोर पितळे

तळा : तळा तालुक्यात शहरासह मोठ्या प्रमाणावर कोरोनाचा प्रादुर्भाव मोठ्या संख्येने वाढत असल्याने तहसीलदार, तळा व्यापारी असोसिएशन व नगरपंचायतने झालेल्या बैठकीत तीन दिवस जनता कर्फ्यु पाळण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

त्यामुळे शहरातील सर्व दुकाने छोटे मोठे दुकानदार सहभागी होत आहेत. मात्र भाजी विक्रेते यांनी बंद ठेवली नाहीत प्रशासनाने लॉकडाऊन शिथिल केल्याने बाजारात नुकताच झालेल्या गौरी गणपती सणाच्या निमित्ताने ....//२

रायगडातील टोलचा झोल बंद करा अन्यथा रायगड भर टोलविरोधी आंदोलन करणार

विश्वतेज साळवी जिल्हाध्यक्ष वंचित बहुजन आघाडी

दै.रायगड नगरी । अमित गायकवाड

पाली/वाघोशी : रायगड जिल्ह्यामध्ये टोलनाक्यावर जनतेच्या होणाऱ्या लुट थांबविण्याकरिता वंचित बहुजन आघाडी आक्रमक झाले असून रायगड मधील टोल नाके बंद करणार असल्याचा इशारा वंचित रायगड जिल्हा अध्यक्ष विश्वतेज साळवी यांनी पाली येथे झालेल्या बैठकीत दिला.

दिनांक ११ रोजी सुधागड तालुका अध्यक्ष अमित गायकवाड यांचे निवासस्थानी रायगड जिल्हा वंचित च्या कार्यकारणीची बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी जिल्ह्यातील सर्व कार्यकर्त्यांनी टोल नाक्यावर होणाऱ्या लुटीचा लेखाजोखा मांडला. यावेळी मुंबई-पुणे एक्स्प्रेसवर असलेल्या मुख्य टोलवर १०३ रुपये इतका टोल पूर्वी आकारला जात होता तो अचानक वाढवून दोनशे रुपये केल्याने जनतेच्या खिशाला मोठा फटका बसला आहे. तसेच शेरंडुग येथे असलेल्या टोल नाक्यावर सोयीसुविधांचा अभाव असून रस्तादेखील खड्डेमय आहे. असते असे

असताना देखील तेथे सक्तीचे व दादागिरी करून टोल आकारला जातो. तर अनेक टोल नाके हे कालावधी संपला असून देखील सुरू आहेत. अशी माहिती सर्व कार्यकर्त्यांनी वंचित जिल्हा अध्यक्ष यांच्याकडे मांडली. यावर प्रतिक्रिया देताना रायगड जिल्हा अध्यक्ष विश्वतेज साळवी यांनी सांगितले की, जगात व भारतात कोरोणो रोगाचा प्रादुर्भाव वाढला आहे मागील पाच महिन्या पासु न जनतेच्या हाताला काहीच काम नाही. लोकांची अक्षरश फरफट झाली आहे. अशा परिस्थितीत हे सरकार टोल नाके लावून जनतेचा उरलासुरला जीवही काढत आहे. आमचे नेते श्रध्येय बाळासाहेब आंबेडकर हे जनहितासाठी लढत आहेत. त्यांच्याच मार्गदर्शनाखाली आम्ही या सरकारला आवाहन करणार आहोत की ....//२

उरणमध्ये एका दिवसात कोरोनाचे ५ बळी तर १८ नवे रुग्ण

दै.रायगड नगरी । उरण

उरणमध्ये काल आठवड्यातून दुसऱ्यांदा एकाच दिवसात कोरोनाचे ५ बळी तर १८ नव्या कोरोना बाधित रुग्णांची नोंद झाली आहे. आत्ता पुन्हा उरण तालुक्यात कोरोना संसर्गजन्य विषाणूचा फैलाव अतिशय वेगाने होऊ लागला आहे. तर २१ रुग्ण कोरोनामुक्त होऊन सुखरूप घरी परतले आहेत.

तालुक्यातील आवरे - १, कोटनाका - १, विंधणे -१, धाकटीजुई व मांडळ आळी नागाव - १ अशा काल एका दिवसात तब्बल ५ रुग्णांचा उपचार घेत असतांना दुर्दैवी मृत्यू झाला आहे. तर धुतुम - १, द्रोणागिरी कॉलिनी कविकमल उरण - २, नागाव पोलिस लाईन - २, कामठा श्वेतानगर उरण - १, नागाव सरवदेवाडी - १, नागाव इंदू कॉलिनी - १, चाणजे - २, म्हातवली - १, ओम साई अपार्टमेंट कामगार वसाहत उरण - १, ...//२

भारतीय मजदूर संघाचे रोजी रोटी वाचवा अभियानाचे उरण तहसिलदारांना निवेदन

दै.रायगड नगरी । जीवन केणी

उरण : कोरोना संसर्गजन्य विषाणूच्या फैलाव रोखण्यासाठी देशासह राज्यात करण्यात आलेल्या लॉकडाऊन झालेल्या अभूतपूर्व परिस्तिथीमुळे सामान्य कामगार स्वयंरोजगार करणारे कामगार हे अत्यंत अडचणीत आले आहेत.राज्य शासनाचे आदेश असतांनाही हजारो कामगारांना कामावरून कमी करण्यात आले. त्याच प्रमाणे अनेक कामगारांना कोरोना काळातील वेतनही अद्याप मिळालेले नाही. घरेलू कामावर घेतले जात नाही. टॅक्सी, रिक्षा सुरू झाल्या मात्र व्यवसाय नाही. मंदिर अद्यापही बंद असल्याने यावर उपजीविका आधारित असलेल्या

हजारो कामगारांच्या कुटुंबियांची अजूनही उपासमार होत आहे.

या पार्श्वभूमीवर राज्यात काल ११ सप्टेंबर रोजी भारतीय मजदूर संघाने रोजी रोटी वाचवा अभियानाच्या निमित्ताने जिल्ह्यातील कामगार व कष्टकाऱ्यांच्या वतीने सर्वत्र जिल्हाधिकारी व तहसिलदार यांच्या मार्फत राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना निवेदन देण्यात आले असून, त्याचे पडसाद उरणमध्येही उमटले आहे. भारतीय मजदूर संघाचे रायगड जिल्हा अध्यक्ष कामगार नेते ....//२

येत्या काही दिवसांत मुसळधार पाऊस कोसळधार; कोकणात ऑरेंज अलर्ट

दै.रायगड नगरी । मुंबई

बंगालच्या उपसागरात निर्माण होणा-या कमी दाबाच्या क्षेत्राचा परिणाम म्हणून पुन्हा एकदा मान्सून सक्रीय होत असून, १२ सप्टेंबरपासून पुढील ४ ते ५ दिवस महाराष्ट्रात बहुतांश ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडेल, अशी शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. याच काळात म्हणजे शनिवारी संपुर्ण कोकण परिसराला ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. तर याच कमी दाबाच्या क्षेत्रामुळे मे महिन्याच्या तिस-या आठवड्यात सुरु होणारा मान्सूनचा परतीचा प्रवास आणखी लांबणार आहे.

बंगालचा उपसागर, आंध्रप्रदेश, ओरिसालगत निर्माण होणा-या या कमी दाबाच्या क्षेत्रामुळे १३ सप्टेंबरच्या आसपास विदर्भासह लगतच्या प्रदेशात चांगला पाऊस होईल. मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि कोकणात या काळात ....//२

आरक्षणाचे राजकारण

घटनात्मक आणि कायदेशीर मुद्द्यांचा कायद्याच्या चौकटीत ऊहापोह करण्याचा आणि त्या संदर्भातील चर्चा, युक्तिवादांच्या आधारे कायदेशीर साक्षरतेच्या दृष्टीने पुढच्या इय़त्तेत जाण्याचा काळ मागे पडला आहे. कायदेशीर मुद्द्यांची उत्तरेही राजकीय चौकटीत शोधण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. ही प्रक्रिया गतिमान करण्यासाठी न्यायसंस्था हातभार लावत असल्याचे चित्रही अधुनमधून समोर येऊ लागले आहे. त्यामुळे कोणत्याही मोठ्या खटल्याच्या निकालानंतर त्यातील कायदेशीर बाबींऐवजी राजकीय पैलूंचीच चर्चा अधिक होताना दिसते. सर्वोच्च न्यायालयाच्या मराठा आरक्षणासंदर्भातील ताज्या निर्णयानेही अशा प्रकारची चर्चा सुरू झाली आहे. महाराष्ट्र सरकारला मोठा धक्का देणारा हा निर्णय संविधानिक चौकटीतला आहे, की राजकीय चौकटीतला याचा ऊहापोह सुरू झाला आहे, तो त्यामुळेच! देवेंद्र फडणवीस सरकारच्या काळात मराठा समाजाला शिक्षण आणि नोकऱ्यांमध्ये एकूण १६ टक्के आरक्षण देण्यात आले. उच्च न्यायालयाने त्यात कपात करून मराठा समाजाला शैक्षणिक बाबींमध्ये १२ टक्के आणि नोकऱ्यांमध्ये १३ टक्के आरक्षण दिले. त्याविरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आल्या. इंदिरा साहनी प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने आरक्षणाची मर्यादा पन्नास टक्के ठरवून दिलेली असताना मराठा आरक्षणामुळे निर्धारित तत्त्वांचे उल्लंघन होत असल्याचा आक्षेप घेण्यात आला होता. अपेक्षेनुसार सर्वोच्च न्यायालयाने हे प्रकरण घटनापीठाकडे पाठवले. परंतु ते पाठवताना मराठा आरक्षणाला स्थगिती दिल्यामुळे महाराष्ट्रात राजकीय गोंधळ उडाला. सर्वोच्च न्यायालयाच्या म्हणण्यानुसार पन्नास टक्यांपेक्षा अधिक आरक्षण अतिशय अपवादात्मक परिस्थितीत देता येते. दुर्गम भागातील आणि समाजाच्या मुख्य प्रवाहापासून दूर असलेल्या लोकांना पन्नास टक्यांपेक्षा जास्त आरक्षण देता येते. ते देतानाही मोठ्या प्रमाणात काळजी घेण्याबरोबरच नियम शिथील करण्यासाठी अपवादात्मक परिस्थिती आवश्यक असते. मराठा समाजाला पन्नास टक्यांपेक्षा जास्त आरक्षण देताना असे आरक्षण देण्यासाठी अतिविशेष परिस्थिती असल्याचे दाखवण्यात महाराष्ट्र सरकाय अपयशी ठरल्याचे सर्वोच्च न्यायालयाचे म्हणणे आहे. महाराष्ट्रात तीस टक्के असलेल्या मराठा समाजाची तुलना समाजातील दुर्गम भागातील उपेक्षित लोकांसोबत होऊ शकत नाही. मराठा समाज सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिकदृष्ट्या मागास असल्याची तसेच सार्वजनिक सेवांमध्ये मराठा समाजाला पुरेसे प्रतिनिधित्व नसल्याची आकडेवारी ही अपवादात्मक कारणे होऊ शकत नसल्याचे मत सर्वोच्च न्यायालयाने नोंदवले. एकूणच पन्नास टक्क्यांचा नियम शिथिल करण्याजोगी परिस्थिती नाही. या संदर्भातील याचिका प्रलंबित असताना या आरक्षणावर शैक्षणिक क्षेत्रात आणि नोकऱ्यांमधील नेमणुका दिल्या तर त्या रद्द करणे अवघड होईल, असे नमूद करून सर्वोच्च न्यायालयाने आरक्षणालाच स्थगिती दिली. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयाचा कायदेशीर दृष्टिकोनातून ऊहापोह करण्याची गरज असताना त्याचे राजकारण सुरू झाले आहे. निकालाच्या कायदेशीर अन्वयार्थाकडे दुर्लक्ष करून त्याचे खापर सरकारवर फोडण्याचे प्रयत्न सुरू आहेत. आणि ते बदलत्या राजकीय संस्कृतीला साजेसेच आहे. मराठा आरक्षणासाठी अनेक वर्षे आंदोलने होत आहेत. चार वर्षांपूर्वी मराठा क्रांतिमोर्चाच्या रेट्यामुळे सरकारला आरक्षणाचा निर्णय घ्यावा लागला. त्या आरक्षणामुळे कमी झालेली सामाजिक अस्वस्थता ताज्या निर्णयामुळे पुन्हा उफाळून येऊ लागली आहे. या निर्णयाला राज्यातील विद्यमान सरकारची भूमिका जबाबदार असल्याचे आरोप करून राजकारणही सुरू झाले आहे. महाविकास आघाडीचे सरकार अस्थिर करण्याचे प्रयत्न अनेक मुद्द्यांच्या आधारे सुरू आहेत. ताजा निर्णय त्यातला महत्त्वाचा टप्पा ठरण्याची शक्यता आहे. मराठा आरक्षणाच्या मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष अशोक चव्हाण यांनी, सर्वोच्च न्यायालयाने दिलेला अंतरिम आदेश अनपेक्षित, धक्कादायक व आश्चर्यकारक असल्याचे म्हटले आहे. या प्रकरणात अनेक घटनात्मक, कायदेशीर मुद्दे आले असल्यामुळे हे प्रकरण घटनापीठाकडे वर्ग करण्याची मागणी होती, ती मान्यही झाली. परंतु, ते घटनापीठाकडे देताना २०२०-२१ या शैक्षणिक वर्षातील प्रवेश प्रक्रिया आणि नोकरभरतीमध्ये मराठा आरक्षण लागू न करण्याचा अंतरिम आदेश अनाकलनीय असल्याचे त्यांनी म्हटले आहे. आर्थिक मागास घटकांच्या आरक्षणाचे प्रकरण किंवा आणखीही काही महत्त्वाची प्रकरणे घटनापीठाकडे वर्ग करताना अंतरिम निर्णय घेतला गेला नाही. मराठा आरक्षणाबाबत न्यायालयाने तो का घेतला, असा प्रश्न आरक्षण समर्थकांना पडला आहे. आरक्षण कायम ठेवल्यास त्यातून मिळालेले प्रवेश आणि नोकऱ्यांमधील नेमणुकांच्या अनुषंगाने भविष्यात गंभीर प्रश्न निर्माण होईल, हे सर्वोच्च न्यायालयाचे म्हणणे या दृष्टीने विचारात घेण्याची आवश्यकता आहे. जागतिकीकरणानंतर शेती उद्ध्वस्त होत गेली, तुकडे पद्धतीने शेतीतले हिस्सेदार वाढले, नोकऱ्यांमध्ये पुरेशा संधी मिळाल्या नाहीत. त्यामुळे मराठा समाजातील बहुसंख्य लोकांची दैन्यावस्था झाली. त्यातून आरक्षणाची मागणी पुढे आली आणि राजकीय पातळीवरही तिला चालना मिळाली. फडणवीस सरकारच्या काळात गायकवाड आयोगाच्या माध्यमातून घटनात्मक चौकटीत मराठा समाजासाठी आरक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आला. परंतु सामाजिक पातळीवरील सगळ्या गोष्टी कायदेशीर चौकटीत सिद्ध करणे कठीण असते आणि तोच मराठा आरक्षणातला मोठा अडथळा ठरत आहे. आमच्या सरकारने दिलेले आरक्षण महाविकास आघाडीला टिकवता आले नाही, असा सूर भाजपने लावला आहे. वर्तमान राजकीय, सामाजिक परिस्थितीत असा राजकीय फायदा उठवण्याचा प्रयत्न होणे स्वाभाविक आहे. भाजप आणि समर्थक पक्षांनी तशी मोर्चेबांधणी सुरू केली आहे. राजकीय पक्षांनी कोणती भूमिका घेऊन कसे राजकारण करायचे, हा त्यांचा त्यांचा विषय असतो. परंतु आपली राजकीय भूमिका सामाजिक स्वास्थ्य बिघडवणारी किंवा त्यासाठी चिथावणी देणारी ठरणार नाही, याचीही काळजी सर्वांनीच घेण्याची आवश्यकता आहे.

राजपुरी जेट्टीचे मंजूर काम प्रथम मार्गी लावण्यात यावे : मनोज भगत

दै.रायगड नगरी । गणेश चोडणेकर

आगरदांडा : मुरुड तालुक्यातील राजपुरी कोळीवाडा या परिसरात ७ कोटी ८२ लाख रुपये किमतीची जेट्टी उभारण्याचे काम मंजूर करण्यात आले होते.यासाठी आयुक्त मत्सालय यांनी दिनांक १४ ऑगस्ट २०१९ रोजी इ- निविदा सुद्धा काढण्यात आली होती.परंतु निधी नसल्यामुळे सदरचे काम रखडले होते. रायगडचे खासदार सुनील तटकरे यांनी नुकताच या भागाचा दौरा करून टोकेखार येथे जेट्टी मंजूर केली आहे.या जेट्टीस आमचा विरोध नाही.परंतु राजपुरी जेट्टीसाठी आमदार जयंत पाटील व माजी आमदार पंडितशेठ पाटील व माजी आमदार मीनाक्षीताई पाटील यांनी प्रयत्न करून हि जेट्टी मंजूर केली होती सदरची जेट्टी ला खासदार साहेबानी सदरचे काम लवकरात लवकर कार्यान्वित करून द्यावे द्यावा अशी मागणी मुरुड तालुका शेतकरी कामगार पक्षाचे तालुका चिटणीस व नगरसेवक मनोज भगत यांनी पत्रकार परिषद घेऊन केली आहे.

साई गौरी लॉजिंग येथे पत्रकार परिषद संपन्न झाली यावेळी त्यांच्या समवेत राजपुरी येथील श्री महालक्ष्मी सोसायटीचे चेरमन विजय गीदि, एकदरा येथील हनुमान मच्छिमार सोसायटीचे चेरमन पांडुरंग आगरकर ,सागर कन्या मच्छिमार सोसायटीचे चेरमन मनोहर बैले ,मोतीराम पाटील, माया वाघरे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

यावेळी मनोज भगत यांनी सांगितले कि, कोरोना विषाणूच्या पार्शवभूमीवर खासदार आमदार त्याच प्रमाणे विकास कामांसाठी निधी गोठवण्यात आला आहे. त्यामुळे टोकेखार येथील नवीन जेट्टी होण्यास खूप वर्षाचा अवधी लागणार आहे.परंतु राजपुरी जेट्टी साठी सर्व प्रक्रिया पूर्ण झालेली असून फक्त निधीची आवश्यकता आहे. रायगडच्या खासदारांनी राजपुरी जेट्टी चे काम सुद्धा जलद गतीने मार्गी लावून कोळी समाजाला व मच्छिमारांना दिलासा द्यावा अशी मागणी पत्रकार परिषदेत त्यांनी केली आहे.

राजपुरी येथील श्री महालक्ष्मी सोसायटीचे चेरमन विजय गीदि यांनी सांगितले कि, राजपुरी जेट्टी हि मध्यवर्ती ठिकाणी असून या जेट्टीवर लिलाव शेड,शीतगृह,फ्लोटिंग जेट्टी,रॅम,शोउचलाय आदी स्वरूपाच्या सोइ सुविधा देण्यात येणार आहेत.राजपुरी येथील मासळी सुकवण्याच्या ओट्याला धरून नवीन जेट्टी विकसित करण्यात येणार होती.सुमारे दोनशे होड्या या ठिकाणी साकारण्याची व्यवस्था या ठिकाणी होणार आहे.रायगडचे खासदार तटकरे यांनी सदर जेट्टीसाठी केंद्र शासनाकडून मत्स्य उद्योग महामंडळास निधी प्राप्त करून दिल्यास या कामाला गती प्राप्त होणार आहे..

यावेळी मनोज भगत यांनी सांगीतले कि,राजपुरी जेट्टीसाठी चे स्वप्न शेकापचे जेष्ठ नेते कृष्णा गीदि यांचे होते.त्यांच्या पाठपुराव्यामुळे सदरच्या कामाला गती मिळाली होती. राजपुरी जेट्टीसाठी केंद्राकडून खासदार तटकरे यांनी मदत दिली तर हे काम निश्चितच मार्गी लागणार आहे.राजपुरी जेट्टीला लागणाऱ्या विविध ना-हरकत दाखले सुद्धा देण्यात आले आहेत.राजपुरी येथे जेट्टी झाल्यास दिघी,आगरदांडा,राजपुरी,कुडगाव,आदी परिसरातील बोटी साकारण्यात मदत होणार आहे.

यावेळी विजय गीदि व मनोहर बैले यांनी खासदार सुनील तटकरे यांचे विशेष आभार व्यक्त केले कि, मच्छिमारांचे प्रश्न सोडवण्यासाठी तटकरे हे आम्हाला नेहमीच सहकार्य करीत असतात.यावेळी उपस्थितांनी टोकेखार येथील जेट्टीस विरोध नसून राजपुरी जेट्टीचे काम सुद्धा जलद गतीने व्हावे अशी मागणी यावेळी त्यांनी केली आहे.

माथेरान नगरपरिषदेचे जनतेच्या सुरक्षिततेसाठी प्रयत्न

दै.रायगड नगरी । मुकुंद रांजाणे

माथेरान : कोरोनाचा वाढता प्रसार पाहता अत्यावश्यक उपाययोजना करण्यासाठी नगराध्यक्षा प्रेरणा सावंत यांनी ठोस पाऊल उचलले असून नागरिकांच्या सेवेसाठी नगरपरिषदेच्या मार्फत मुख्य रस्त्यावर सोडियम हायपोक्लोराईडची फवारणी केली नगरपरिषद आपल्याला सर्वोतोपरी काळजी घेण्यास तत्पर आहे त्याहीपेक्षा जास्त आपण स्वसुरक्षासाठी आपल्या स्वतः बरोबर आपल्या परिवार, समाज, आपलं माथेरान ची सुरक्षा जपणं अत्यावश्यक आहे. शासनाचे नियम पाळा आपण सर्वांनी एकत्रितपणे एकमेकांना सुरक्षित ठेवायची जबाबदारी आपली सर्वांची आहे.असेही आवर्जून नगराध्यक्षा प्रेरणा प्रसाद सावंत यांनी सांगितले आहे.

माथेरान हे छोटेसे पर्यटनस्थळ असल्याने सर्वजण एकमेकांच्या नेहमीच सान्निध्यात येत असतात. त्यामुळे नकळत स्पर्शाने अथवा चुकून एखादया घोळक्यात संभाषण करताना कोरोनाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असते.माथेरान अन लॉक केल्यापासून थोड्या प्रमाणात का होईना पर्यटकांचा ओघ दिवसेंदिवस सुरू आहे.

पुढील काळात पर्यटन हंगाम सुरू होणार असल्याने प्रत्येकाने सेनेटायझर आणि मास्क लावून आपापले व्यवसाय करताना काळजी घेणे गरजेचे आहे. नगरपरिषदेच्या दवाखान्यात वैद्यकीय अधिकारी वर्ग रुग्णांची उत्तम प्रकारे तपासणी करून घेत आहेत. दरदिवशी कोरोना रुग्ण वाढत आहेत. त्यासाठी स्वतंत्र खोल्यांमध्ये रुग्णांची सोय नगरपरिषदेने केलेली असून रुग्ण लवकरच बरे सुध्दा होत आहेत.

कोरोना या आजाराला कंटाळून चालणार नाही तर त्याचा मुकाबला करण्यासाठी आपण प्रशासनाने दिलेल्या नियम व अटींचे पालन करणे आवश्यक आहे. आपले व्यवसाय करतांना स्वतः योग्य ती काळजी घेऊन ग्राहकांना सुध्दा त्याप्रमाणे सुविधा उपलब्ध व्हावी यासाठी दुकानदार आणि हॉटेल व्यावसायिक यांनी सर्वतोपरी सहकार्य करावे. कुणा पर्यटकांनी मास्क लावला नसेल तर त्यांना काही वस्तू विकत देऊ नयेत.मास्क न लावणाऱ्या व्यक्तीवर पर्यटकांवर सुध्दा नगरपरिषदे मार्फत दंडात्मक कारवाई करण्याचे सत्र सुरू केले आहे. कोरोना वर मात करण्यासाठी सर्वांनी स्वतासह इतरांची सुध्दा काळजी घेऊन प्रशासनास सहकार्य करावे.

प्रसाद सावंत --गटनेते माथेरान नगरपरिषद

कोंडीवली मुख्याध्यापक राजेश तोडणकर यांना आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर

दै.रायगड नगरी । श्रीवर्धन

तालुक्यातील रायगड जिल्हा परिषदेच्या कोंडीवली शाळेचे मुख्याध्यापक राजेश चंद्रकांत तोडणकर यांना शिक्षण विभागाच्या वतीने देण्यात येणारा सन२०२०-२०२१ चा आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर झाला असून शिक्षण क्षेत्रामध्ये भरीव कामगिरी करणाऱ्या तोडणकर यांचेवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

श्रीवर्धन तालुक्यातील रा जि प मराठी प्राथमिक शाळेचे विद्यमान मुख्याध्यापक राजेश तोडणकर यांनी आपल्या २३ वर्षाच्या शिक्षक सेवेमध्ये ज्ञानदानाचे उत्तम कार्य केले आहे. त्याचप्रमाणे भट्टीचा माळ या प्राथमिक शाळेचे लोक सहभागातून डिजिटल, कोंडीवली शाळा स्वतः व उपशिक्षक मिळून डिजिटलकरणं केले

असून कमी पटसंख्येमुळे समस्येमध्ये वेढलेल्या किसान हायस्कूल वाळवटी, ता. श्रीवर्धन या माध्यमिक विद्यालयाला गत वैभव प्राप्त होण्यासाठी माझी विद्यार्थी म्हणून काम करीत असताना सर्व माजी विद्यार्थ्यांना एकत्र घेवून पंचक्रोशी विकास मंडळ स्थापन करण्यात आले.

या मंडळा च्या मार्फत गरजू विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात येते शिवाय दुर्गम भागा-तील विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये यासाठी त्यांच्या येणे जाण्यासाठी मंडळाच्या वतीने मोफत रिक्षा वयवस्था व विद्यार्थ्यांना मंडळाच्या खर्चाने एस टी पास देण्यात येतात,

या मंडळाच्या कार्यात महतवाची भूमिका राजेश तोडणकर यांची आहे. त्यांच्या या सर्व कार्याची दखल घेत शिक्षण विभागाच्या वतीने राजेश तोडणकर यांना सण २०२०-२०२१ या वर्षीचा आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर करण्यात आला असून त्यांचेवर शैक्षणिक, सामाजिक राजकीय क्षेत्रातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे

भारतीय जनता युवा मोर्चाची विदर्भ विभागाची आढावा बैठक संपन्न

दै.रायगड नगरी । पनवेल

भारतीय जनता युवा मोर्चा विदर्भ विभागाची विडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे आढावा बैठक महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष विक्रांत बाळासाहेब पाटील यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या बैठकीत भाजयुमो च्या वतीने सेवा सप्ताह व आगामी कार्यक्रम यांवर चर्चा करण्यात आली.

बैठकीला भाजयुमो प्रदेश युवा मोर्चा प्रदेश अध्यक्ष विक्रांत बाळासाहेब पाटील, भाजयुमो सरचिटणीस शिवानी दाणी, भाजयुमो प्रदेश उपाध्यक्ष वामन तुरके, प्रदेश सचिव सोपान कानेरकर, प्रदेश सचिव अंकुश ठाकूर, प्रदेश कार्यकरणी सदस्य संकेत बावनकुळे तसेच विदर्भातील सर्व भाजयुमो जिल्हाध्यक्ष, सरचिटणीस उपस्थित होते.

पृष्ठ क्र.१ वरून...

८० टक्के प्राधान्य केवळ कागदावरच

मोठ मोठ्या कपंनी, प्रकल्प, आस्थापनांकडून केराची टोपली दाखवली जात आहे. शासनाच्या या ऋण ला काहीच किंमत दिले जात नाही. विविध कंपन्या, प्रकल्प, आस्थापने या शासनाच्या परिपत्रकाला जुमानत नाहीत त्यामुळे

स्थानिकांना नोकरीत ८० टक्केचे परिपत्रक निघाले मात्र त्याचा स्थानिकांना कुठेच फायदा होताना दिसून येत नाही. त्या अनुषंगाने या परिपत्रकाचे कायद्यात रूपांतर करावे अशी मागणी मनसेने केली आहे. या परिपत्रकाचे कायद्यात रूपांतर झाल्यास विविध आस्थापने, विविध कंपनीला सरकारच जबाबदार असेल. सरकारचा या सर्व कंपन्यांवर सरकारचा जरब बसेल व स्थानिकांना नोकरीत संधी मिळेल.

प्रभाग १९ मधील विकासकामासंदर्भात आढावा बैठक

बागवान मोहल्ला ते ढोबी आळी रस्ता पुर्न:पुष्टीकरण करणे, विश्राळी नाका ते तक्का भुयारी रस्त्याचे काम करणे, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते पंचरत्न सर्कल मोटार सायकल पार्किंग वाहनतळ विकसित करणे, कोळीवाडा येथे ३० सीटचे शौचालय बांधणे, रोहिदासवाडा येथे नाले बांधकाम करणे, वडघर कोळीवाडा पुलास समांतर बंधारा बांधणे आदी कामांचा समावेश असून हि कामे मार्गस्थ लावण्यासंदर्भातही या आढावा बैठकीत विचारविनिमय झाले.

व्यापारी असोसिएशने तीन दिवस तळा बाजारपेठ बंद

किंवा आर्थिक व्यवहारासाठी बँकेत मोठ्या प्रमाणावर गर्दी होत होती तसेच सणासाठी मुंबईतून अनेक चाकरमानी आल्याने कोरोना प्रादुर्भाव वाढल्याचे दिसून येत आहे. बाज-ारपेठ बंद केल्याने बऱ्यापैकी संक्रमण रोखण्यास मदत होईल अशी खात्री वाटते त्यामुळे शुक्रवार ते रविवार असा तीन दिवसाचा जनता कर्फ्यु पाळण्यात येणार आहे अशी माहिती तळा व्यापारी असोशिएशने प्रसिद्धीला दिलेल्या पत्रात म्हटले आहे. तरी कोरोना संक्रमण रोखण्यासाठी नागरीकांनी सहकार्य करावे. असे आवाहन तळा नगरपंचायत तसेच तालुका प्रशासनाने कडून करण्यात येत आहे.

रायगड भर टोलविरोधी आंदोलन करणार

आपण वाढवू टोल नाके बंद करा अथवा जोपर्यंत करूनच प्रादुर्भाव कळत नाही तोपर्यंत टोल नाके बंद करा . अन्यथा वंचित बहुजन आघाडी रायगड भर टोल विरोधात तीव्र आंदोलन करेल असा इशारा त्यांनी सुधागड तालुका येथे झालेल्या बैठकीत दिला. या बैठकीला रायगड जिल्हा अध्यक्ष विश्वतेज साळवी , महासचिव सागर भालेराव, सुधागड तालुका अध्यक्ष अमित गायकवाड, संदीप गाडे खालापूर तालुका अध्यक्ष दीपक गायकवाड, कर्जत तालुका अध्यक्ष धर्मेंद्र मोरे, किरण मोरे, स्वप्नील गायकवाड, नारायण जाधव, आनंद जाधव, संजय घाग, विशाल मातोळे, प्रशांत जाधव, सिद्धार्थ सोनवणे, सारथी महामुंकर, प्रदीप वसंत ढोले लोकेश चंद्र यादव, सुनील देऊ गायकवाड, गणेश बनसोडे, आदी उपस्थित होते.

एका दिवसात कोरोनाचे ५ बळी तर १८ नवे रुग्ण

केगाव - १, भेंडखळ - १, चिंतामणी बंगला, मंगलमूर्ती अपार्टमेंट, कुंभारवाडा उरण - १, आवरे - १, कोटनाका - १ व विंधणे - १ असे कोरोना पॉझिटिव्ह १८ रुग्णांची नोंद झाली आहे.

तर जेएनपीटी टाऊनशिप - ५,नवीनशेवा - ३,भेंडखळ - २,बोकडविरा - २,धसाखोशी - २,जसखार - १,करंजा - २ व उरण - ४ असे एकूण २१ रुग्ण कोरोनामुक्त झाले आहेत. आत्तापर्यंत उरण तालुक्यातील २ हजार ७४० नागरिकांची कोरोना चाचणी करण्यात आली असून,त्यातील १हजार ५९८ कोरोना पॉझिटिव्ह रुग्ण आढळून आले आहेत. त्यातून १ हजार २७४ रुग्ण ठठणीत बरे झाले आहेत.तर ७९ रुग्णांचा उपचार घेत असतांना दुर्दैवी मृत्यू झाला आहे.

याशिवाय २४५ विद्यमान कोरोनाग्रस्त रुग्ण बोकडविरा व जेएनपीटी येथील कोविड सेंटरमध्ये उपचार घेत आहेत.कोरोनाचा प्रादुर्भाव आत्ता पुन्हा एकदा जोमाने फैलाऊ लागल्याने उरण तालुक्यातील नागरिकांनी अधिक काळजी घ्यावी ,बाजारपेठेत किंवा कोणत्याही ठिकाणी गर्दी करू नये असे आवाहन उरणचे तहसिलदार भाऊसाहेब अंधारे यांनी केले आहे.

उरण तहसिलदारांना निवेदन

सुरेश पाटील यांनी काल उरणच्या तहसिलदारांकडे निवेदन सादर केले आहे.

राज्यात कोरोनाचा प्रसार मोठ्या वेगाने वाढत आहे. सामान्य नागरिक व कामगार त्यासाठीचा खर्च करू शकत नाही. मोठमोठ्या रुग्णालयांकडून नागरिकांची लूट होत आहे. औषधोपचारावरील खर्च प्रचंड वाढला आहे. सामान्य डॉक्टरही किमान ५०० रुपये तपासणी फी घेऊ लागले आहेत. त्यामुळे सामान्य व गरीब नागरिक मेटाकुटीस आला आहे. याशिवाय महात्मा फुले जनआरोग्य योजनेचा लाभ सर्वच रुग्णालयांमध्ये रुग्णांना मिळत नाही. त्यामुळे सामान्य कामगार कर्जबाजारी होत आहे.

केंद्र सरकारने कामगारांसाठी लागू केलेल्या अनेक योजनांची अंमलबजावणी महाराष्ट्र राज्यात झालेली नाही. लाखो कामगार व नागरिकांना शासनाने दिलेले अल्पदरातील धान्य मिळालेले नाही.रोजगार हमीच्या कामांचा निधी अन्यत्र वळविण्यात आला आहे.त्यामुळे सामान्य कामगार रोजगाराला मुखले आहेत. ते पूर्ण स्थापित करण्याची आवश्यकता आहे. या सर्व प्रश्नांकडे शासनाचे लक्ष केंद्रित व्हावे यासाठी भारतीय मजदूर संघाच्या वतीने रोजी रोटी वाचवा अभियान राज्यात सर्वत्र राबविण्यात आले आहे.

कोरोना काळात कामावरून कमी करण्यात आलेल्या कायम व कंत्राटी कामगार, कर्मचारी आणि प्रकारचे नोकर यांना कामावर घेण्यात यावे,असे आदेश सरकारने द्यावेत.शासनाचे आदेश असतांना कोरोना काळात वेतन न दिलेल्या कामगारांना संपूर्ण वेतन मिळावे.स्वस्त धान्य न मिळालेल्या कामगार व नागरिकांना स्वस्त धान्य देण्याची व्यवस्था करावी.

महात्मा फुले जन आरोग्य विमा योजना कोरोनाच्या सर्व प्रकारच्या रुग्णांसाठी रुग्णालयातून लागू करण्यात यावी.शहरातील एम.बी.बी.एस.व बी.ए.एम.एस.डॉक्टरचे तपासणी दर संबंधित विभागानुसार निश्चित करण्यात यावे, व अवास्तव फी आकारणाऱ्या डॉक्टरांवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी.

राज्यातील सर्व रोजगार सुरु करण्यात यावेत,ज्यांचे रोजगार सुरू झाले नाहीत त्यांना निर्वाह भत्ता देण्यात यावा.याशिवाय स्थलांतरित नोंदणी सुरू करण्यात येऊन त्यांना रोजगार देण्यात यावा.राज्यातील सर्व कामगारांना त्याचे जीवन नियमित सुरू करता यावे,त्यांचा रोजगार सुरक्षित रहावा प्रभावी उपाययोजना लवकरात लवकर करावी व महाराष्ट्र राज्यातील जनजीवन पूर्व पदावर येण्यासाठी कार्यवाही करावी असे निवेदन भारतीय मजदूर संघाचे रायगड जिल्हा अध्यक्ष तथा कामगार नेते सुरेश पाटील यांनी उरणच्या तहसिलदारांमार्फत राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना दिले आहे.

येत्या काही दिवसांत मुसळधार पाऊस कोसळधार

मान्सून सक्रीय राहील. १४ आणि १५ सप्टेंबर रोजी महाराष्ट्रात बहुतांश ठिकाणी मोठा पाऊस होईल. कमी दाबाच्या क्षेत्रासह हवामानात होणा-या बदलामुळे परतीच्या मान्सूनचा प्रवास विलंबाने होईल, असा अंदाज वर्तविल जात आहे. १५ सप्टेंबरच्या आसपास मान्सून राजस्थानमधून आपला परतीचा प्रवास सुरु करतो. मात्र यावेळी त्यास १५ दिवसांचा विलंब होण्याची शक्यता आहे. दुसरीकडे मुंबईचा विचार करता येथे गेल्या कित्येक दिवसांपासून पाऊस बेपत्ता आहे. आर्द्रतेमधील चढउतार आणि कमाल तापनात होणारी किंचित वाढ या घटकांमुळे मुंबईचे वातावरण काहीसे तापदायक होत आहे. ऊनं, ऊकाडा आणि अधून मधून बरसणारा पाऊस अशा तिहेरी वातावरणामुळे मुंबई काहीशी त्रासल्याचे चित्र आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

खा.सुनील तटकरे यांच्या म्हसळा येथील शासकीय आढावा बैठकीचा सकारात्मक परिणाम

रखडलेली विकास कामे आणि जनतेच्या तक्रारीची शासन स्तरावर घेतली जात आहे दखल

दै.रायगड नगरी । उदय कळस

म्हसळा : ०३ जुन रोजी झालेल्या निसर्ग चक्रीवादळात नैसर्गिक आपद्ग्रस्तांना शासनाने देवु केलेली मदत ४ महिने उलटूनही म्हसळा तालुक्यातील अनेक गावांतील लाभार्थ्यांना मिळण्यास विलंब झाल्याने तालुक्यात लोकांचा मोठया प्रमाणावर तक्रारीचा सुर वाढला होता या बाबत रायगडचे खासदार सुनिल तटकरे यांनी लागलीच दखल घेत दिनांक ७ सप्टेंबर रोजी म्हसळा येथे शासकीय अधिकारी वर्गाची आढावा बैठक घेऊन येत्या ०३ ऑक्टोबर पर्यंत रखडलेली विकास कामे आणि नैसर्गिक आपद्ग्रस्तांच्या सर्वच तक्रारींचे निवारण करून हा विषयच संपवून टाकावा अन्यथा कारवाईला सामोरे जा असा निर्वाणीचा दिला होता त्या नुसार आता कामाला सुरुवात होताना दिसत आहे.

खासदार सुनिल तटकरे यांनी म्हसळा तालुका तहसीलदार, महसूल विभाग, कृषी, बांधकाम, पंचायत समिती, पाणी पुरवठा, दुरसंचार, मराविमच्या संबंधित अधिकारी वर्गाला सुचित केल्या नुसार त्यांचे आदेशाची गंभीर दखल घेत म्हसळा तालुक्यातील लहान मोठया विकास कामांना सुरुवात झाली तर नैसर्गिक आपत्ती बाबतीतही जनतेच्या तक्रारिचे झटपट निवारण होत आहे. या कामी तहसिल कार्यालयात स्वतंत्र टेबल लावुन कामकाज पाहिले जात आहे. म्हसळा पाणी पुरवठा योजनेच्या पाईपलाईन टाकण्याच्या कामाला गती मिळाली आहे, राज्य मार्गावरील नादुरुस्त जोड रस्त्याचे दुरुस्ती कामाला सुरूवात झाली आहे. शासन मंजुरी झालेल्या विकास कामांची टेक्निकल मंजुरी देण्याचे कामास गती मिळाली आहे. प्रेमाने सांगूनही जनतेची काम होत नाहीत म्हणुन खासदार सुनिल तटकरे यांनी कामचुकार अधिकारी यांचे बोलुन वेळीच नाक दाबल्याने त्यांनी आता हाताने काम करण्यास सुरुवात करून अप्रत्यक्षपणे तोंडे उघडली आहेत अशी खमंग चर्चा तालुक्यात सुरू झाली आहे.

महाराष्ट्र शासनाने म्हसळा तालुक्यातील नैसर्गिक आपत्तग्रस्तांसाठी मदत म्हणुन ५४ कोटी रुपयांची मंजुरी दिली आहे त्या पैकी ३४ कोटी ३ लक्ष रुपयांचे वाटप करण्यात आले आहे तर उर्वरित रक्कम ०३ ऑक्टोबरच्या आधीच वितरित करा अशा अधिकारी वर्गाला सुचना केल्या नुसार तशा प्रकारे कामकाज होत असताना तहसिल कार्यालयात भेट घेतली असता निदर्शनास आले. श्रीवर्धन प्रांताधिकारी अमित शेडगे यांनी विभागाचे सर्वच अधिकारी वर्गाला खासदार तटकरे यांनी सुचित केल्या प्रमाणे कामकाज करा अशी सक्त ताकीद म्हसळा तहसिल कार्यालयातील बैठकीत दिली आहे.

खासदार सुनिल तटकरे यांनी जनतेच्या तक्रार निवारण बाबत श्रीवर्धन मतदार संघातीच्या ०३ ऑक्टोबरच्या आयोजित आढावा सभेत पुन्हा सांगितलेल्या कामांची व आदेशाचा आढावा घेणार आहेत. कोरोना प्रादुर्भावावर मात करण्यासाठी खासदार सुनिल तटकरे यांनी सुचविलेल्या उपाययोजनांना म्हसळा तालुक्यात गेल्या दोन दिवसांत सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. मध्यंतरीच्या कालावधीत कोरोना प्रादुर्भाव बाबतीत लोक गांभीर्याने घेत नसल्याचे खासदार सुनिल तटकरे यांना निदर्शनास आले त्यांनी लागलीच संबंधीत अधिकारी वर्गावर नाराजी व्यक्त करून मास्क लावणे अनिवार्य करा व अँटीजंट टेस्ट करण्याची सक्त ताकीद दिली असता आता म्हसळा शहरात ९८%लोकांच्या तोंडावर मास्क दिसत आहे तर ग्रामीण रुग्णालयात रोजच ४० ते ५० जणांची अँटीजंट टेस्ट करून दिली जात आहे.या कामी खासदार सुनिल तटकरे यांनी जिल्हा शल्यचिकित्सक आणि रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे करवी १००० तपासणी किटची उपलब्धता करून दिली आहे.

अनलॉक ४ संपल्यावर गणेशोत्सव काळात म्हसळा शहरात सोशियल डिस्टन्स,मास्क लावणे आणि अन्य काळजी घेण्याचे बाबतींत लोकांनी दुर्लक्षित केल्याने तालुक्यात आता रोज चार ते पाच कोरोना बाधीत रुग्ण आढळुन येत आहेत. मास्क न लावणाऱ्या लोकांवर पोलिस प्रशास–नाचे मदतीने म्हसळा नगरपंचायतीने दंडात्मक कारवाईला सुरवात केली आहे तसेच नगर पंचायतीच्या अध्यक्षा जयश्री कापरे यांनी दवंडी देत सोशल मिडियाचे माध्यमातून कोरोना प्रादुर्भाव रोखण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.शनिवार दिनांक १२ सप्टेंबर २०२० रोजी खास.सुनिल तटकरे म्हसळा दौऱ्यावर येत असून तालुक्यातील काही विकास कामांबद्दल आढावा घेणार असल्याचे खात्रीशीर वृत्त आहे.

खाजगी कोविड रुग्णालयात डिपॉझिटसाठी अडवणूक

रुग्णालय व्यवस्थापनाच्या धोरणाबद्दल तीव्र नाराजी ; एकता सामाजिक संस्थेने उठवला आवाज

दै.रायगड नगरी । पनवेल

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील खाजगी कोविड रुग्णालयांकडून रुग्णांना दाखल करून घेण्या अगोदर डिपॉझिट भरून घेतले जात आहे. अन्यथा त्या ठिकाणी उपचार नाकारले जात असल्याच्या अनेक तक्रारी येत आहेत. रुग्णालय व्यवस्थापनाकडून रुग्णांच्या नातेवाईकांची अडवणूक केली जात आहे. यासंदर्भात एकता सामाजिक संस्थेने आवाज उठवला आहे. डिपॉझिटच्या कारणावरून रुग्णांचे उपचार थांबू नयेत अशी मागणी संस्थेच्या वतीने करण्यात आलेले आहे.

पनवेल महानगरपालिका क्षेत्राचा विचार करिता दिवसेंदिवस रुग्ण संख्या वाढत चालली आहे. सध्या पनवेल उपजिल्हा रुग्णालय आणि एमजीएम कामोठे हे दोनच जिल्हा कोविड हॉस्पिटल आहे. इतर रुग्णालय हे खाजगी कोविड हॉस्पिटल्स आ–हेत. पनवेल महानगरपालिका कोरोना रुग्णांवर उपचार करण्याची परवानगी संबंधितांना दिली आहे. दरम्यान तेथे वैद्यकीय उपचार करीत असताना शासनाने ठरवून दिलेल्या दरानुसार बिल घेण्याचे बंधनकारक करण्यात आले आहे. अनेक पळवाटा शोधून खाजगी रुग्णालय रुग्णांना लुटत आहेत. इतकेच नाही तर ७०–८० हजार अनामत रक्कम मागत आहेत. पहिले पैसे भरा त्यानंतरच रुग्णाला दाखल करून घेऊ अशा प्रकारे रुग्णालय प्रशासन बेजबाबदारपणे वागत आहेत. दरम्यान यासंदर्भात महापालिकेचे अधिकाऱ्यांना तसेच टोल फ्री नंबरवर संपर्क साधला असता. त्यांच्याकडून कोणतीही प्रतिसाद मिळत नसल्याचे दिसून येत आहे.

पनवेल पालिकेचा गलथान कारभार

अनेक रुग्ण पनवेल पालिकेच्या गलथानपणाचा शिकार झाले आहेत. संबंधितांना योग्य पद्धतीने सल्ला दिला जात नाही. त्यामुळे रुग्णाने नातेवाईकांना इकडून तिकडे फिरावे लागते. त्यामुळे कित्येकदा रुग्णांचा जीव धोक्यात सापडतो. पनवेल महापालिकेच्या हेल्प लाईन नंबर उचलले जात नाहीत . ते सतत व्यस्त दाखवण्यात येतात. कोरोनाची महामारी असताना हि पालिका प्रशासन अपुरे पडत आहे. अधिकारी वर्गात अजूनही नागरिकांबाबत गांभीर्य नाही असे दिसून येत नाही. असे मत सामाजिक संस्थेचे अमोल शितोळे यांनी व्यक्त केले आहे.

कामोठे सेक्टर १४ मधील एक ४८ वर्षीय व्यक्ती कोविड– १९ बाधित झाली. त्यानंतर त्यांना देवांशी इन येथे उचारासाठी नेण्यात आले. पण तिथे एक्स–रे तसेच इतर कोणत्याही टेस्ट केल्या नाहीत. त्यांना फक्त जुबजुबी औषधे देण्यात आले. त्यानंतर तुम्ही कोविड– १९ मुक्त झालात असे जाहीर करून तीन सप्टेंबर ला त्यांना घरी सोडण्यात आले. परंतु ६ सप्टेंबरला त्यांना पुन्हा त्रास होऊ लागला, आणि नातेवाईकांनी हॉस्पिटलसाठी शोधाशोध सुरु केली, परंतु नेहमी प्रमाणे पनवेलची शोकांतिका सामोरी आली. त्यांनी कळंबोली येथील हॉस्पिटल मध्ये चौकशी केली असता त्यांनी ७० हजार अनामत रक्कम मागितली. परंतु त्वरित ७० हजार भरण्यास नसल्याने रुग्ण दाखल करून घेतला नाही, अनामत रक्कम नसेल तरीही उपचार करणे बंधनकारक आहे हे महाराष्ट्र शासनाचे परिपत्रक आहे. याला रुग्णालयांकडून सरळ–सरळ हरताळ फासला जात आहे. शेवटी संबंधित रुग्णाला कोणताच पर्याय नसल्याने वाशी मनपाच्या रुग्णालयात नेण्यात आले. तिथेही पनवेलचे रहिवाशी असल्याने त्वरित उपचार मिळणे कठीण झाले. शेवटी रुग्णाची ऑक्सिजन लेव्हल ३८ वर आल्यावर त्यांनी रुग्णाला दाखल करून घेतले.

प्रशासनाने लक्ष घालून यात सुधारणा घडवून आणणे गरजेचे आहे. त्यासाठी सर्व हॉस्पिटलची बैठक घेऊन हा प्रकार पुन्हा घडू नये याबाबत सूचना कराव्यात. रुग्णांना त्यांच्या नातेवाईकांना हेल्पलाईन वरून योग्य ती माहिती मिळावी जेणेकरून त्यांची ससेहोलपट होणार नाही. त्याचबरोबर खाजगी रुग्णालयांनी डिपॉझिट दिले नाही म्हणून उपचार थांबू नयेत अशा प्रकारच्या सूचना संबंधित व्यवस्थापनाला देण्यात याव्यात. अशी मागणी महापालिका आयुक्तांकडे केली आहे.

अमोल शितोळे
एकता सामाजिक संस्था

कुसुंबळे हद्दीतील आदिवासी वाडीतील लोकांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप

दै.रायगड नगरी । राजेश बाष्टे

अलिबाग : लाईफ फाऊंडेशन आणि ग्रामपंचायत कुसुंबळेच्या संयुक्त विद्यमाने कुसुंबळे हद्दीतील आदिवासी वाडीतील ३५० लोकांना जीवनावश्यक अन्नधान्य तसेच हँडवॉश आणी मास्कचे वाटप करण्यात आले.

त्यावेळी लाईफ फाऊंडेशनच्या अध्यक्ष पूनम लालवानी, शिवसेना अलिबाग तालुका प्रमुख राजाभाई केणी, डायरेक्ट विनोद लाला, मंडळ अधिकारी रमेश म्हात्रे, कुसुंबळे ग्रामपंचायत सरपंच मीनाताई लोभी, उपसरपंच रसिका ताईकेणी, ग्रामपंचायत सदस्य उत्तम शेठ पाटील प्रमोद पाटील आतिश नाईक, जागृती पाटील, अपर्णा कोठेकर, विभागातील तलाठी एस. एस. वावेकर, नलिनी पाटील, दयानंद सुर्यवंशी, कोतवाल सुनिल काळे, सामाजिक कार्यकर्ते मन्मय पाटील, तंटामुक्ती अध्यक्ष गजानन खरसंबळे, उल्हास पाटील आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

मतदारयाद्यांचा विशेष संक्षिप्त पुन:र्रिक्षण कार्यक्रम घोषित

दै.रायगड नगरी । अलिबाग

मा.भारत निवडणूक आयोगाकडून दि. १ जानेवारी २०२० या अर्हता दिनांकावर आधारित मतदारयाद्यांचा विशेष संक्षिप्त पुन:र्रिक्षण कार्यक्रम जाहीर झाला असून त्याची माहिती सहायक मतदार नोंदणी अधिकारी, १९२–अलिबाग विधानसभा मतदार संघ तथा अलिबाग तहसिलदार सचिन शेजाळ यांनी कळविली असून ती माहिती पुढीलप्रमाणे :–

दावे व हरकती निकाली काढणे, गुरुवार दि. २७ ऑगस्ट २०२०, अंतिम प्रसिद्धीसाठी मतदारयाद्यांची विशेष तपासणी, सोमवार दि. ७ सप्टेंबर २०२०, डाटाबेसचे अद्यावतीकरण, पुरवणी याद्यांची छपाई शुक्रवार दि.१८ सप्टेंबर २०२०, अंतिम मतदारयादी प्रसिद्धी, शुक्रवार, दि. २५ सप्टेंबर २०२०.

पनवेल तालुका पत्रकार विकास मंचातर्फे ज्येष्ठ पत्रकार संतोष पवार यांना श्रद्धांजली

दै.रायगड नगरी । पनवेल

माथेरानचे ज्येष्ठ पत्रकार संतोष पवार यांचे बुधवारी दु:खद निधन झाले. ऑक्सिजन पातळी कमी झाल्याने त्यांना कर्जत येथून नवी मुंबई येथे रुग्णवाहिकेत नेत असताना त्यांची प्राणज्योत माल–वली. पवार यांच्या अचानक मृत्यूने ने रायगड जिल्ह्याच्या पत्रकारीतेवर शोककळा पसरली आहे.पनवेल तालुका पत्रकार विकास मंचातर्फे आज दिनांक ११ सप्टेंबर रोजी त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.तसेच राज्यभरात कोविड मुळे बळी गेलेल्या १३ पत्रकार बांधवांना देखील श्रद्धांजली वाहण्यात आली.

संतोष पवार हे मराठी पत्रकार परिषदेचे माजी सरचिटणीस होते. रायगड जिल्हा प्रेस क्लबचे अध्यक्ष पद सुद्धा त्यांनी भूषवले. उत्तम पत्रकार, सामाजिक कार्यकर्ता आणि राजकीय विश्लेषक म्हणून त्यांची ओळख होती. शासनाच्या

अधिस्वीकृती समितीवर ते कार्यरत होते. सोबत तीन दशकांची मैत्री असल्याचे तसेच माथेरान नगरपालिकेवर नगरसेवक म्हणूनही ते निवडून गेले होते. पांडुरंग रायकर नंतर वेळेत योग्य उपचार न मिळाल्याने संतोष पवार यांच्या रूपाने हलगर्जी पणाच्या मुळे दुसऱ्या पत्रकाराचा बळी गेल्याने अध्यक्ष माधव पाटील यांनी खंत व्यक्त केली. संतोष पवार यांच्या सांगत यावेळी ते भावनाविवश झाले.

या श्रद्धांजली कार्यक्रमास अध्यक्ष माधव पाटील यांच्या समवेत, मंदार दोंदे, विवेक पाटील, संजय कदम, अनिल भोळे, प्रशांत शेडगे, राजू गाडे, भालचंद्र(बाळू) जुमलेदार आदी पत्रकार बांधव उपस्थित होते.

जिल्हा न्यायाधीश कार्यालयातील जुने वाहन खरेदी करु इच्छिणाऱ्यांनी मोहोरबंद किंमतीच्या निविदा सादर कराव्यात

दै.रायगड नगरी । अलिबाग

प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रायगड–अलिबाग यांच्या नियंत्रणाखालील जिल्हा न्यायाधीश–एक, रायगड–अलिबाग यांना पुरविण्यात आलेले शासकीय वाहन मारुती बलेनो व्ही.एक्स.आय. क्र.एम.एच.०१/पीए/५०५० हे दि. १६ मे २०१९ रोजी निर्लेखित करण्यात आले आहे.

तरी हे वाहन योग्य ती किंमत देऊन खरेदी करू इच्छिणाऱ्या लोकांकडून मोहोरबंद किंमतीच्या निविदा मागविण्यात आल्या आहेत. हे वाहन जिल्हा न्यायालय, रायगड अलिबाग यांच्या न्यायालयाच्या आवारात पाहण्यासाठी उपलब्ध आहे. कार्यालयीन वेळेत ते इच्छुक लोकांना पाहता येईल. ज्या कोणाला हे वाहन खरेदी करावयाचे असेल, त्यांनी प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रायगड–अलिबाग यांच्या नावाने मोहोर बंद किंमतीच्या निविदा दि.२८ सप्टेंबर २०२० रोजी, सकाळी ११.०० वाजेपर्यंत प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रायगड–अलिबाग यांच्या कार्यालयात पोहोचतील, अशा बेताने सादर कराव्यात. दि. २८ सप्टेंबर २०२० रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत प्राप्त न झालेल्या निविदा किंवा अपूर्ण असलेल्या निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत. अनामत रक्कम म्हणून रुपये ५ हजार रकमेचा अलिबाग येथील स्टेट बँक ऑफ इंडिया या बँकेच्या नावाचा डिमांड ड्राफ्ट प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रायगड–अलिबाग यांच्या नावाने काढून निविदेसोबत जोडणे आवश्यक आहे. संबंधित लखोटा मोहोरबंद केलेला अस–ावा व त्यावर वाहन क्रमांक एम.एच.०१/पीए/५०५० साठी निविदा असे ठळक अक्षरात लिहिलेले असावे.निविदा दि.२९ सप्टेंबर २०२० रोजी सकाळी ११ वाजता प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रायगड–अलिबाग यांच्या कार्यालयात उघडण्यात येतील.

निविदा स्विकारल्याचे कळविल्यानंतर तीन दिवसांत पूर्ण रक्कम भरुन वाहन घेवून जावे लागेल. तसे न केल्यास भरलेली रक्कम शासनाकडे जमा होईल व परत दिली जाणार नाही. ज्यांच्या नावे निविदा मंजूर करण्यात आली असेल त्यांनी संपूर्ण रक्कम जमा करुन वाहन न नेल्यास पुन्हा निविदा मागवून वाहनाची विल्हेवाट लावण्यात येईल.

कोणतेही कारण न दाखविता कोणतीही किंवा सर्व निविदा स्वीकारण्याचा किंवा फेटाळण्याचा अधिकार प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रायगड विभाग यांनी राखून ठेवला आहे, असे प्रमुख जिल्हा न्यायाधीश विभा प्र.इंगळे यांनी कळविले आहे.

केंद्रीय पथकाने घेतला मदतवाटपाचा आढावा; जिल्हाधिकाऱ्यांना सूचना

दै.रायगड नगरी । अलिबाग

निसर्ग चक्रीवादळाने रायगडसह रत्नागिरी जिल्ह्याला चांगलाच फटका दिला होता. त्यामध्ये मोठ्या प्रमाणात घरे, बागा आणि विजेच्या खांबांचे नुकसान झाले होते. झालेल्या नुकसानीबाबत जिल्हा प्रशासनाने कोणती कार्यवाही केली याचा आढावा केंद्रीय पथकाने गुरुवारी घेतला. त्यांनी जिल्हाधिकारी यांना काही महत्त्वपूर्ण सूचनाही केल्या.

केंद्र सरकारच्या आंतर मंत्रालयीन पथकामध्ये रमेशकुमार गंटा, आर.बी. कौल, एन.आर.एल.के. प्रसाद, एस.एस. मोदी, आर.पी. सिंग आणि तुषार व्यास यांचा समावेश होता. दौजयाच्या प्रारंभी या पथकाने अलिबाग तालुक्यातील रेवदंडा आणि वरसोली या ठिकाणी प्रत्यक्ष पाहणी करून तेथील नुकसानग्रस्त नागरिकांशी संवाद साधत प्रशासनाकडून देण्यात आलेल्या मदतीबाबतची माहिती जाणून घेतली. पाहणी दौजयानंतर अलिबाग सोगाव येथील आउट पोस्ट हॉटेल येथे आयोजित केलेल्या बैठकीत जिल्हाधिकारी निधी चौधरी, रत्नागिरीचे जिल्हाधिकारी लक्ष्मीनारायण मिश्रा यांनी संगणकीय सादरीकरणाद्वारे दोन्ही जिल्ह्यांत प्रशासनाकडून केलेल्या कार्यवाहिची माहिती केंद्रीय पथकाला दिली.

नुकसानभरपाईपासून कोणीही वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी, अशा सूचना त्यांनी चौधरी आणि मिश्रा यांना केल्या. कृषी विभाग, मत्स्य विभाग, महसूल विभाग, महावितरण यासंबंधित

सर्व विभागांच्या क्षेत्रीय स्तरावरील अधिकाऱ्यांनी जनतेच्या झालेल्या नुकसानीची तत्परतेने नोंद घेऊन आपली जी काही कामे असतील ती पूर्ण करून घ्यावीत, असेही सांगितले.

याप्रसंगी मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुहास माने, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी पांडुरंग शेळके, कार्यकारी अभियंता सा.बां. विभाग, अलिबाग आर.एस. मोरे, उपविभागीय अधिकारी शारदा पोवार, तहसीलदार सचिन शेजाळ तसेच रायगड व रत्नागिरी जिल्ह्यातील विविध सरकारी कार्यालयांचे वरिष्ठ अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

निसर्ग चक्रीवादळाच्या आपत्तीमध्ये जिल्हा प्रशासनाने घेतलेल्या खबरदारीमुळे अत्यंत कमी जीवितहानी झाली. संपर्क यंत्रणा अत्यंत कमी वेळात सुरू करण्यात यश मिळविले; तसेच वाहतुकीसाठी रस्ते अत्यंत कमी वेळात खुले करण्यात आले. वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी युद्धपातळीवर काम सुरू करण्यात आले. गरजूंना अत्यंत तातडीने अन्नधान्याचा पुरवठा करण्यात आला त्याबद्दल जिल्हा प्रशासनाचे विशेष अभिनंदन केले.

नागोठणे टपाल कार्यालय गैरसोयीं विरुध्द आंदोलन ; भाजपा शहर अध्यक्ष सचिन मोदी आक्रमक

दै.रायगड नगरी । संजय रिकामे

तळा : टपाल सेवा व संदेशवहन सेवा उपलब्ध करणारी भारत सरकारची यंत्रणा आहे.भारतीय टपाल व तार विभाग हा केंद्रीय दळणवळण मंत्रलयाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली येत असून या विभागाचा सर्वाधिक रोजगार पुरविणाऱ्या निगमांमध्ये दुसरा क्रमांक लागतो. परंतु सध्या नागोठणे येथील टपाल कार्यालयात वारंवार तांत्रिक अडचणींचे कारण देऊन अनेक महत्त्वाच्या सेवा नाकारल्या जात असल्याने शहरासह परिसरातील जनता त्रस्त झाली आहे. याबाबत नागोठणे शहर भाजपाचे अध्यक्ष सचिन मोदी यांनी आक्रमक भूमिका घेतली असुन टपाल कार्यालयाकडुन सुरळीत सेवा उपलब्ध न झाल्यास आंदोलन करण्याचा इशारा देत यासंदर्भात त्यांनी लेखी निवेदन नागोठणे येथील टपाल कार्यालयात दिले यावेळी त्यांच्या समवेत भाजपा रोहे तालुका सरचिटणीस आनंद लाड, तालुका उपाध्यक्ष शेखर गोळे, तालुका अल्पसंख्याक सेलचे अध्यक्ष रऊफ कडवेकर, नागोठणे शहर महिला आघाडी अध्यक्षा श्रेया कुंटे, शहर उपाध्यक्ष गौतम जैन आदि मान्यवर उपस्थित होते.

नागोठणे टपाल कार्यालयात स्वखर्चाने ईनवाईटर बसवुन देणार

कॉम्प्युटर वारंवार बंद असतात ईनवाईटरची सुविधा नाही याबाबत अलिबाग कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी श्री.चीरमे यांच्याकडे भाजपा शहर अध्यक्ष सचिन मोदी यांनी संपर्क साधला असता त्यांनी ईनवाईटरची सुविधा नागोठणे टपाल कार्यालयात उपलब्ध केली असल्याचे सांगितले परंतु सद्यपरिस्थितीत नागोठणे येथे ईनवाईटर बसवलेले नाही त्यामुळे ईनवाईटर गेले कुठे हा आता संशोधनाचा विषय असला तरी सामान्य जनतेचे हाल होऊ नये म्हणुन सचिन मोदी यांनी स्वखर्चाने ईनवाईटर बसुन देण्याची तयारी दर्शवली असुन आपण त्यासाठी सहकार्य करावे अस आवाहन केले आहे.भाजपा शहर अध्यक्ष आणि रोटरी क्लबचे अध्यक्ष सचिन मोदी यांनी जनतेसाठी उचलेले पाऊल कौतुकास्पद असुन त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

नागोठणे टपाल कार्यालयाकडुन सुरळीत सेवा उपलब्ध न झाल्यास आंदोलन करण्याचा इशारा देत यासंदर्भात त्यांनी लेखी निवेदन नागोठणे येथील टपाल कार्यालयात दिले यावेळी त्यांच्या समवेत भाजपा रोहे तालुका सरचिटणीस आनंद लाड, तालुका उपाध्यक्ष शेखर गोळे, तालुका अल्पसंख्याक सेलचे अध्यक्ष रऊफ कडवेकर, नागोठणे शहर महिला आघाडी अध्यक्षा श्रेया कुंटे, शहर उपाध्यक्ष गौतम जैन आदि मान्यवर उपस्थित होते.

नागोठणे टपाल कार्यालयात वारंवार तांत्रिक अडचणी दाखवून महत्वाच्या अनेक सेवा नाकारल्या जात असल्याने शहरासह परिसरातील गावांमधील नागरिकांना टपाल कार्यालयात खेटे मारावे लागत आहेत. अधिकारी वर्गाकडुन येथे मनमानी सुरु आहे. विद्युत पुरवठा खंडित झाल्यावर काम ठप्प होत असल्याने लाईट नसल्यामुळे काम होणार नाही अशी उडवा उडवीची असे उत्तर दिले जात आहे.त्यामुळे एका कामासाठी चार पाच वेळा कार्यालयात पायपीट करावी लागत आहे.त्याचप्रमाणे स्पीडपोस्ट, रजिस्टर तसेच इतर अनेक सेवा अनियमित असल्याने त्याचा नाहक त्रास ग्राहकांना होत आहे.वरिल गैरसोयींबाबत भाजपा नागोठणे शहर अध्यक्ष सचिन मोदी यांनी नागोठणे टपाल कार्यालयात आपल्या कार्यकर्त्यांसह उप डाकपाल नरेश पाटील यांची भेट घेऊन गैरसोयींबाबत चर्चा केली व लाईटचे कारणांमुळे ग्राहकांना सेवा देण्यास अडचण होत असेल तर स

येथे इन्व्हर्टर बसवून का घेतला जात नाही ? असा सवाल त्यांनी यावेळी केला सर्व्हर कायम डाऊन असल्यामुळे या अडचणी निर्माण होत असून बीएसएनएल कंपनीकडून ही सुविधा मिळत असल्याचे पाटील यांनी यावेळी सांगितले.

ग्राहकांना योग्य सुविधा देण्यासाठी आपण आपल्या वरिष्ठ कार्यालयाशी योग्य तो पत्र व्यवहार करून जनतेची समस्या तातडीने मार्गी लावण्यासाठी प्रयत्न केलेत का?असे अनेक प्रश्न भाजपा शहर अध्यक्ष सचिन मोदी यांनी उपस्थित करुन अधिकारी वर्गाला धारेवर धरले येत्या काही दिवसात टपाल सेवा सुरळीत न मिळाल्यास भारतीय जनता पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असे सांगुन त्या संदर्भात निवेदन देखील टपाल कार्यालयास दिले.सचिन मोदी यांच्या आक्रमक भुमिकेमुळे टपाल कार्यालय कशी सेवा उपलब्ध करुन देते याकडे संपुर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

कर्जत आगाराच्या दांड मार्गे एसटीच्या फेऱ्या पुन्हा सुरू

दै.रायगड नगरी । कर्जत

कर्जत आगारातून दांडफाटा रसायनी मार्गे कर्जत–पेण एसटी गाडीच्या परतीच्या फेऱ्या सुरु करण्यात आल्या आहेत. यामुळे रसायनी औद्योगिक क्षेत्रातील तसेच आजूबाजूला असलेल्या कारखान्यातील कामगार यांना फायदा होणार आहे. तसेच पेण आणि अलिबागकडे सरकारी कामानिमित्त जाणाऱ्या प्रवाशांचीही सोय होणार आहे.

पेण आणि कर्जत परिसरातून तसेच मार्गावरील गावांतून पाताळगंगा, अतिरिक्त पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रातील कारखाने तसेच क्षेत्राबाहेरील कारखान्यात मोठ्या प्रमाणात कामगारवर्ग येत असतो. या औद्योगिक वसाहतीत येणाऱ्या कामगारांची आणि पेण, अलिबागकडे जाणाऱ्या प्रवाशांना सर्वाधिक आसरा हा एसटी गाड्यांचा असतो. मात्र लॉकडाऊन काळात मोठ्या प्रमाणात वाहतूक बंद असल्याने नेहमी वर्दळ अस–लेली वसाहत थंड झाली होती. चार महिन्यांनंतर

प्रवाशांच्या सोयीसाठी पेण आणि कर्जत आगारामधून दांड मार्गे एसटी गाड्या सुरू करण्यात आल्या आहेत. सुमारे १३ एसटी गाड्यांच्या फेऱ्या या मार्गावर चालविण्यात येत आहेत. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर एसटी गाड्यांच्या फेऱ्या मार्चपासून बंद करण्यात आल्या होत्या.

अनलॉकनंतर असल्याने कारखाने पूर्ववत होऊ लागले आहे. कामगारवर्ग तसेच या मार्गावरील गावे येथील ग्रामस्थ यांना कर्जत, पेण आणि अलिबागकडे जाताना गैरसोय होत होती. शासनाने एसटी गाड्यांची वाहतूक सुरू करण्याचा निर्णय घेतल्यानंतर कर्जत आगाराने एसटी गाड्या सुरू केल्या आहेत.

कर्जतहुन 'पेणकडे जाणाऱ्या गाड्या या दिवसातून चार वेळा सोडल्या जात आहेत. तसेच पेणहून कर्जतकडेदेखील चार गाड्या सोडल्या जात आहेत. त्यामुळे कर्जत एसटी आगारातून सोडण्यात येणाऱ्या एसटी गाड्यामधून प्रवास करावा, असे आवाहन एसटी महामंडळ करीत आहे.

महामंडळाकडून एसटी गाडीने प्रवास करताना प्रवाशांनी कोरोनाच्या प्रादुर्भाव टाळण्यासाठी नियमाची अंमलबजावणी केली. जाते. या एसटी गाड्या दर रविवारी बंद राहतील. त्याचवेळी एसटी गाडीला प्रवासी भारमान वाढले नाही, तर बस सुरु ठेवण्याबाबत फेर विचार करावा लागेल, मात्र सुरु झालेल्या एस टी सेवेचा फायदा प्रवाशांनी घ्यावा, असे आवाहन कर्जत एसटी आगाराचे व्यवस्थापक शंकर यादव यांनी केले आहे.

पनवेल ग्रामीणमध्ये अँटीजेन चाचण्यास सुरुवात

शिवसेनेचे विधानसभा समन्वयक प्रदीप ठाकूर यांच्या मागणीला यश

दै.रायगड नगरी । पनवेल

पनवेल ग्रामीणमध्ये कोरोनाचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात आहे. याठिकाणी तुलनेत चाचण्यांचे प्रमाण कमी आहे. कोरोना विषाणूंचे संक्रमण थांबवण्यासाठी मनपा हद्दीच्या धर्तीवर तालुक्यात रॅपीड अँटीजेन चाचण्यांच्या करण्याची गरज निर्माण झाली त्यात होती. त्यानुसार प्रशासनाने प्रादुर्भाव झालेल्या क्षेत्रात अशा प्रकारचे केंद्र सुरु करावेत अशी मागणी शिवसेनेचे पनवेल विधानसभा समन्वयक प्रदीप ठाकूर यांनी केली होती. त्यांच्या मागणीची दखल घेत ग्रामीण भागात अशा प्रकारच्या चाचण्यास सुरुवात झाली आहे.

अँटीजेन टेस्ट मध्ये रक्ताच्या नमुन्यातून १५ ते २० मिनिटांत शरीरात कोणते विषाणू आहेत याचा तपास लागतो. संशयिताच्या शरीरात कोरोनाविरोधात लढण्यासाठी ॲन्टिबॉडी काम करतंय की नाही, हे या चाचणीतून तापसलं जातं. लक्षणं नसलेल्या लोकांसाठी रॅपिड टेस्टिंग वरदान ठरतंय. रुग्णाच्या शरीरात ॲन्टिबॉडी कार्यरत नसेल तर त्या व्यक्तीला कोरोनाची लागण होण्याची शक्यता असते. रॅपिड अँटीजेन टेस्टिंगमार्फत या रुग्णांची माहिती मिळते. मुख्यत: ज्यांना कोरोनाची लक्षणं दिसतात त्यांच्या घशातील स्वॅब घेऊन चाचणी करण्यात येते, त्यामुळे त्यांना कोरोनाची बाधा झाली आहे की नाही याची माहिती मिळते. मात्र ज्यांना लक्षणं दिसत नाहीत, त्यांना कोरोनाची बाधा झाली आहे की नाही हे तपासण्याची रॅपिड अँटीजेन टेस्टिंगचा वापर केला जातो. ही चाचणी कमी वेळात आणि खर्चात केली जात आहे.

पनवेल ग्रामीण भागाचा विचार करता आजूबाजूच्या परिसरात नागरीकरण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. येथील लोकवस्ती जास्त असलेले कोरोना संसर्ग वाढत चालला आहे. आदई, विचुंबे, पाली देवद, सुकापुर, आकुर्ली, उसर्ली यासह इतर ठिकाणी कोरोना संसर्ग वाढत चालला आहे.

नागरीकरण झालेल्या या भागात रॅपिड अँटिजेन चाचणी केंद्र सुरू करण्याची मागणी शिवसेनेचे पनवेल विधानसभा समन्वयक प्रदीप ठाकूर यांनी केली होती. त्यानुसार प्राथमिक आरोग्य केंद्रांना जवळपास ३००० कीट उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. याठिकाणी

अँटिजेन चाचण्यास सुरुवात झाली आहे. लक्षणांची त्वरित माहिती मिळाल्याने उपचार सुद्धा लवकर केले जात आहेत. परिणामी करोना विषाणू संक्रमण थांबण्यासाठी या चाचण्यांचा फायदा होऊ लागला आहे.

रॅपिड अँटीजेन चाचणीद्वारे अवघ्या अर्ध्या तासात कोरोनाबाबतचे निदान होत असल्याने संबंधित रुग्णास तातडीने उपचारार्थ दाखल करून प्रसार रोखण्यास मदत होत आहे. या अनुषंगाने पनवेल महानगरपालिका हद्दी प्रमाणेच ग्रामीण भागातही कोरोनाचा वाढता संसर्ग आटोक्यात आणण्याकरीता रॅपिड अँटीजेन चाचण्या सुरु करण्यात याव्यात अशी शिवसेनेची मागणी होते. याबाबत प्रशासनाने सकारात्मक भूमिका घेऊन चाचण्यास सुरुवात केली आहे. त्याबद्दल तालुका प्रशासनाचे शिवसेनेकडून आभार मानण्यात येत आहेत.

प्रदीप ठाकूर, पनवेल विधानसभा समन्वयक, शिवसेना

चक्रीवादळग्रस्तांची वीजबिले माफ करा

आ.अनिकेत तटकरे यांची ऊर्जामंत्र्यांनी मागणी

दै.रायगड नगरी । श्रीकांत शेलार

दांडगुरी : रायगड व रत्नागिरी जिल्ह्यांत ३ जून रोजी आलेल्या चक्रीवादळामुळे अनेकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. त्यातच गेली दोन महिने अव्वाच्या सव्वा वीजबिले आल्याने येथील चक्रीवादळग्रस्थांना वीजबिले भरणास कसे हा प्रश्न रोजच्या रोज सतावत आहे. याचीच दाखल घेत विधानपरिषद आमदार अनिकेत तटकरे यांनी एका प्रत्राद्वारे राज्याचे ऊर्जामंत्री नितीन राऊत यांना वीजबिले माफ करण्याचे पत्र दिले आहे.

३ जून रोजी आलेल्या निसर्ग चक्रीवादळ मुळे रायगड जिल्ह्यातील सात व रत्नागिरी जिल्ह्यातील तीन तालुक्यांना मोठा फटका बसला होता. आधीच लोकडाऊन मुळे सर्वसामान्य जनता हि घरी च होती. काही कामधंदा नसल्याने हातात पैसाच राहिला नसल्याचे चित्र आहे. सर्वसामान्य जनतेचे आधीच आर्थिक गणित बिघडले आहे. तब्बल दिड

ते दोन महिन्या नंतर वीज पुरवठा सुरळीत झाला. त्यामुळे संगणकीय प्रणालीद्वारे भरमसाठ वीजबिले आली आहेत. हे निदर्शनास आणून देत आमदार अनिकेत तटकरे यांनी ऊर्जामंत्रांना हि वीजबिले माफ अथवा रद्द करण्याची मागणी केली आहे.

शिबीर घेतली मात्र समाधान नाही

महावितरण कडून जास्तीच्या वीजबिले बाबत तक्रार निवारण करण्यासाठी शिबीर घेण्यात आली मात्र त्यात सामान्य जनतेला बिले भरण्याचे सांगण्यात आली. सामान्य जनतेला साधारण चार ते पाच हजार इतकी वीजबिले आली आहेत. त्यामुळे कामधंदा नसलेले कुटुंब कसे बिले भरणार असाही प्रश्न उपस्थित राहत आहे.

वीजबिले भरायचे कि थांबायचे ?

आमदार अनिकेत तटकरे यांनी ऊर्जामंत्रांना पत्राद्वारे वीजबिले माफ करण्याची विनंती केल्याने थोडासा दिलासा मिळाला आहे. मात्र शासन कोणताही निर्णय घेईपर्यंत थांबावे का असा प्रश्न सामान्य जनता विचारात आहे.

वाघिवली, पनवेल येथील बुध्द लेणी नष्ट करणाऱ्यांवर कारवाई करण्याचे राष्ट्रवादी काँग्रेस सामाजिक न्याय विभागाचे निवेदन

दै.रायगड नगरी । पनवेल

राष्ट्रवादी भवन, मुंबई येथिल जनता दरबारात मा. खासदार सौ.सुप्रियाताई सुळे, राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार, रायगडच्या पालकमंत्री कु.अदितीताई तटकरे यांना राष्ट्रवादी काँग्रेस सामाजिक न्याय विभागाच्यावतीने वाघिवली वाडा, पनवेल येथिल बुध्द लेणी नष्ट करणाऱ्या सिडको व संबंधित ठेकेदारावर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. खासदार सुप्रियाताई सुळे यांनी व पालकमंत्री अदितीताई तटकरे यांनी त्वरित चौकशी चे आदेश दिले.

वाघीवली वाडा (ओवळे), ता.पनवेल, जिल्हा रायगड येथिल बुध्द लेणी सर्वे क्र.१९३ दिनांक ७ सप्टेंबर २०२० रोजी रात्रीच्या आंधारात लेणीच्या आतील बुध्द मुर्ती आणि इतर पुरातत्वीन अवशेष सिडकोचे अधिकारी व नवी मुंबई विमानतळ सपाटीकरण करण्यासाठी नेमलेले ठेकेदार यांच्या संगनमताने चोरुन नेले व सदर लेणी नष्ट करण्यात आली. त्या संदर्भात दिनांक ०८.०९.२०२० रोजी वरिष्ठ पोलीस निरिक्षक,पवनेल शहर पोलिस ठाणे येथे सिडको व संबंधित ठेकेदार यांच्या विरुध्द तक्रार दाखल करण्यात आली. सदर निंदणीय घटनेची महाराष्ट्रातुन व देशातून आंबेडकरी जनतेकडून, विविध संघटनेकडून तीव्र निषेध व्यक्त होत आहे. या निंदणीय घटनेची चौकशी करावी. संबंधितावर कार्यवाही करावी. तसेच सदर जागेवर आपण भेट दयावी हि विनंती पनवेल शहर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष श्री.किशोर देवधेकर सर यांनी केली.

सोबत गणेश पाटील, राष्ट्रवादी जेष्ठ नागरिक सेल प्रमुख भाऊसाहेब लबडे, प्रभाग ५ अध्यक्ष, खारघर राष्ट्रवादी युवक कार्याध्यक्ष प्रदिप पाटील आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्र्यांच्या महत्वाकांक्षी प्रकल्पांमुळे शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित

दै.रायगड नगरी । कर्जत

येथील प्रादेशिक कृषी संशोधन केंद्रातर्फे मुख्यमंत्री उद्धवजी ठाकरे यांच्या महत्वाकांक्षी ' विकेल ते पिकेल ' अभियानांतर्गत ' मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट)', ' ग्राम पातळीवर ग्राम कृषी विकास समिती स्थापना', व ' पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर रोपवाटिका योजना ', या तीन महत्वाच्या प्रकल्पांच्या ऑनलाइन उद्घाटन सोहळ्यात सहभागी होण्यासाठी वदप येथील प्रगतशील शेतकरी श्री कैलास दळवी यांच्या शेतावर आयोजित केलेल्या कार्यक्रमास कर्जत व खालापूर तालुक्यातील शेतकऱ्यांनी प्रतिसाद देत स्वागत केल्याने एका आगळ्यावेगळ्या कार्यक्रमाची नोंद झाल्याची प्रतिक्रिया व्यक्त होत असून बळीराजाच्या आशा पल्लवित झाल्या आहेत.

मुख्यमंत्री उद्धवजी ठाकरे, कृषिमंत्री दादाजी भुसे, फलोत्पादन मंत्री संदीपन राव भुमरे, कृषी राज्यमंत्री विश्वजित कदम व फलोत्पादन राज्यमंत्री आदिती तटकरे इत्यादी मान्यवर ऑनलाइन शेतकऱ्यांशी संवाद साधणार असल्याचे जाहीर झाल्याने शेतकऱ्यांमध्ये उत्कंठा होती.महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाने या कार्यक्रमाचे आयोजन राज्यपातळीवर केले होते.डॉ बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोलीच्या विस्तार शिक्षण संचालक कार्यालयाकडून सदर कार्यक्रम शेतकऱ्याच्या बांधावर आयोजित करण्याच्या सूचना देण्यात आल्याने वदप येथील प्रगतशील शेतकरी कैलास दळवी यांच्या शेतावर २०० मीटर अंतरावरून इलेक्ट्रिक जोडणी घेऊन लॅपटॉप, वायफाय, इन्व्हर्टर इत्यादींची सोय करीत सामूहिकरीत्या शेतकऱ्यांना सहभागी करून

कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

ऑनलाईन मार्गदर्शन करताना मुख्यमंत्री उद्धवजी ठाकरे यांनी बाजारपेठेचा कल ओळखून मूल्यसाखळी निर्माण करतानाच शेतमालाला हमखास भाव मिळण्यासाठी ' विकेल ते पिकेल ' अभियान उपयुक्त ठरेल, अशी ग्वाही दिली. शेतकऱ्यांच्या मजबूत संघटनेची गरज प्रतिपादित करीत गटशेतीच्या माध्यमातून बाजारपेठ असलेला मालच शेतकऱ्यांनी उत्पादित करावा, असे आवाहन त्यांनी केले.शेतकरी हाच देव असल्याचे स्पष्ट करीत विविध योजनांद्वारे त्यांना बळकटी मिळवून देण्याचे प्रयत्न शासन करीत असून ज्यांच्या नावाने योजना कार्यान्वित होत आहे त्यांच्या नावाला साजेसे कार्य शेतकऱ्यांनी करून राज्याला नावलौकिक मिळवून द्यावा, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

दादाजी भुसे यांनी केलेल्या कार्याचा नेटक्या शब्दात आढावा घेतला.उपस्थित मान्यवरांनी केलेल्या मार्गदर्शनाने कृषिला ' अच्छे दिन ' येतील,अशा प्रतिक्रिया शेतकऱ्यांनी दिल्या. या कार्यक्रमाचे नियोजन सहयोगी संशोधन संचालक डॉ रमेश कुणकेरकर व विस्तार शिक्षण शास्त्रज्ञ डॉ रवींद्र मर्दाने यांनी केले.

प्रगतशील शेतकरी निलिकेश दळवी, नयनिश दळवी व कैलास दळवी यांनी सर्व सुविधा बांधावर उपलब्ध करून देण्यासाठी अथक परिश्रम घेत सहभाग नोंदविला.कोरोनाच्या पार्श्वभूमीवर नियमांचे पालन करीत या कार्यक्रमात सर्वश्री अण्णा पवार, भरत देशमुख, यशवंत गायकवाड, दत्तात्रय देशमुख,अशोक ताम्हाणे, अनंत बासरे,प्रमोद पिंगळे, रवींद्र देशमुख, प्रवीण देशमुख,विलास पालकर,सुनील भागवत, जगदीश पवार,आप्पा गायकवाड,मच्छीन्द्र पारठे यांच्यासह खालापूर तालुक्याच्या शेतकरी शास्त्रज्ञ मंचाचे अध्यक्ष गजानन दळवी प्रामुख्याने उपस्थित होते. उपस्थित शेतकऱ्यांचे आभार डॉ रवींद्र मर्दाने यांनी मानले.